ग्राममंगल
INNOVATIONS IN LEARNING

शिक्षणवेध

वर्ष : अकरावे । ई-अंक : एकविसावा । जानेवारी २०२०

आपण बालककेंद्री होण्याचा प्रयत्न करू या!

नवा गडी नवे राज्य

बालपणातील खेळ आणि मेंदूविकास

शालेय संस्कृतीत वाचनाचे महत्त्व

भाषेद्वारे सर्जनशीलतेचा विकास

ग्राममंगल
INNOVATIONS IN LEARNING

शिक्षणवेध

वर्ष: अकरावे । ई –अंक : एकविसावा । जानेवारी २०२०

ISBN : 978-81-927549-0-1

संपादक
रमेश पानसे

कार्यकारी संपादक
डॉ. वैखरी वैद्य

संपादक मंडळ
डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत
सुषमा पाध्ये

सजावट व मांडणी
ग्राममंगल

संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार
गांधी भवन परिसर, अंध मुलींच्या शाळेशेजारी,
कोथरूड,
पुणे – ४११०३८
संवाद : ०२० –२५३८६६८७
shikshanvedh@grammangal.org

आपण बालककेंद्री होण्याचा प्रयत्न करू या!	रमेश पानसे	२
नवा गडी नवे राज्य	अश्विनी गोडसे	६
बालपणातील खेळ आणि मेंदूविकास	डॉ. दिनेश नेहेते	१०
भाषेद्वारे सर्जनशीलतेचा विकास	अरुंधती डोळस /सुग्रा चुनावाला	१२
शालेय संस्कृतीत वाचनाचे महत्त्व	अनिल कुलकर्णी	१६
Towards responsible citizenship: an effort in Anand Niketan	Sushama Sharma	२१

भाषेद्वारे सर्जनशीलतेचा विकास - एक उपक्रम

अरुंधती डोळस, सुग्रा चुनावाला

सर्जनशीलतेचा संबंध बऱ्याचदा कल्पनाशक्ती, नावीन्यपूर्ण विचार, यांच्याशी केला जातो. सर्जनशीलतेच्या व्याख्या अनेक आहेत, पण साधारणतः सर्जनशीलतेचा एखाद्या व्यक्तीच्या काहीतरी नवीन, योग्य निर्मिती करण्या बाबतचा संबंध जोडला जातो. बोडेन (२००१) सर्जनशीलतेचे वर्णन असे करतात,व्यक्तीच्या नव-नवीन कल्पना सुचण्याची क्षमता. ह्या कल्पना आश्चर्यकारक असूनही समजण्यासारख्या आणि मोलाच्या देखील असू शकतात. आमच्या मते भाषेतील सर्जनशीलता म्हणजे, कल्पनाशक्तीचा उपयोग करून अर्थपूर्ण व मनोरंजकरित्या अभिव्यक्त होणे. सर्जनशीलता ही संकुचित नसून बहुसंख्य व्यक्तींकडे असू शकते. मानव हा एक सामाजिक प्राणी आहे व तो सर्जनशील आहे, म्हणूनच आपल्याकडे अनेक सर्जनशील कलाकार, विचारवंत, लेखक, रचनाकार, उद्योजक आणि विद्यार्थी आहेत.

शालेय जीवनामध्ये विद्यार्थी आपल्या सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या सर्वच कृतींमध्ये सहभाग घेताना दिसून येतात आणि अशा संधीची आतुरतेने वाटही पाहतात. कला, विज्ञान आणि भाषा यांसह अनेक विषयांमध्ये विद्यार्थी आपली सर्जनशीलता व्यक्त करतांना दिसून येतात. प्रस्तुत लेखात होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राद्वारे राबविल्या गेलेल्या एका उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये भाषेद्वारे सर्जनशीलतेचा विकास करण्याचा प्रयत्न कसा केला गेला याचे वर्णन केले आहे.

होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राने, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या अभ्यासक्रमाशी संलग्न असलेल्या शेजारच्या एका मराठी माध्यमाच्या शाळेची यासाठी निवड केली. सदर प्रकल्प मागील चार वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. प्रकल्पांतर्गत आम्ही वर्षभर विद्यार्थ्यांशी विज्ञानविषयाबाबत संवाद साधत आहोत. तसेच प्रकल्पात उन्हाळी शिबिर देखील घेतले जाते. या शिबिराचा कालावधी सुमारे १ महिना इतका असतो. मे २०१७ मध्ये झालेल्या अशाच उन्हाळी शिबिरात इयत्ता पाचवीत प्रवेश घेणाऱ्या सुमारे १२ विद्यार्थ्यांचा समावेश होता. या शिबिरामध्ये प्रत्येक दिवशी दोन वेगवेगळी सत्रे घेतली गेली. पहिल्या सत्रात पाचवी च्या पर्यावरण अभ्यासातील घटकांची चर्चा होत असे व दुसऱ्या सत्रात अभ्यासपूरक वेगवेगळे उपक्रम राबवले गेले, यांमध्ये

चित्रफीत बनविणे, सायकलचे मॉडेल बनविणे, भाषाविकासावर आधारित सत्र, विज्ञान आणि प्रसारमाध्यमे अशा अनेक मजेदार आणि विविध उपक्रमांचा समावेश केला गेला. उन्हाळी शिबिराचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानातील तसेच निरनिराळ्या घटकांची ओळख करून देणे आणि दैनंदिन जीवनात त्याचा परस्पर संबंध जोडणे हा आहे.

शिबिरात निरनिराळ्या घटकांची ओळख करून देताना भाषेद्वारे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता प्रोत्साहित करणे व त्यांचे भाषा कौशल्य विकसित करणे हे ही या शिबिरामधील हेतू होते. भाषेच्या सत्रामध्ये अनेक कृतींचा समावेश केला गेला होता. उदा. अक्षर चित्र, गोष्ट वाचन, शब्दखेळ, काव्यरचना, कथालेखन, शब्दकोडी, चित्रवर्णन इत्यादी. प्रस्तुत लेखात काव्यरचना व कथालेखन या दोन कृतींचा सविस्तर आढावा घेतला आहे. या कृतींच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांमधील सृजनशीलतेला कसा वाव देण्याचा प्रयत्न करण्यात आला याचे विश्लेषण केले आहे. त्यासाठी खाली नमूद केलेल्या काही बाबींवर जास्त भर दिला गेला.

कल्पनाशक्तीचा उपयोग करणे

दोन घटकांमध्ये संबंध जोडणे

घटनेमध्ये योग्य क्रम मांडणे

नवनवीन शब्दांचा उपयोग करणे

कविता रचना : या उपक्रमात ४ विद्यार्थी एका गटात असे मुला-मुलींचे एकत्र ३ गट तयार केले. विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील ४ पूर्णपणे वेगळ्या व असंबंधित चित्रांची कात्रणे दिली. या चित्रांचा एकमेकांशी संबंध जोडून त्या आधारे कवितेच्या ओळी लिहिण्यास सांगितल्या. विद्यार्थ्यांनी गटात चर्चा करून कवितेच्या ओळी तयार केल्या. एका गटात दिलेली चित्रे व त्यांनी रचलेली कविता नमुन्यादाखल खाली दिलेली आहे.

वाटते मला की, कुक व्हावे
कधी हॉटेलमध्ये तर कधी किचनमध्ये
वाटते मला की, कुक व्हावे.
वाटते मला की, फोटोग्राफर व्हावे
कधी फुलपाखरांचे तर कधी मोरांचे
वाटते मला की, फोटोग्राफर व्हावे.
कधी वाटते मला की, शॉपिंग मॉलमध्ये जावे
आणि काही भाजी आणावी आणि काही चॉकोलेट घ्यावे
कधी वाटते मला की, शॉपिंग मॉल मध्ये जावे.
कधी वाटते मला की, कॉफी पियावेत

कविता तयार करणे या कृतीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारशक्तीला वाव मिळतो तसेच विचार व्यक्त करण्यास संधी मिळते. भाषाकौशल्य जसे वाक्य बनविणे, शब्द जोडणे, वाक्यांमध्ये संबंध जोडणे; लेखन कौशल्ये, शब्दांची मांडणी, विश्लेषक आणि सर्जनशील विचार यांसारखी प्राथमिक उद्दिष्टे कविता तयार करणे साध्य करतात. कविता रचणेमध्ये भाषेची रचनात्मक बदल आणि मनोरंजक मार्गाने हाताळणी करण्याची संधी मिळते. तिन्ही गटांना दिलेल्या कात्रणांचा त्यांच्या परीने संबंध जोडून कविता करण्याचा प्रयत्न केला.

कथालेखन:

कथालेखन हा उपक्रम देखील विद्यार्थ्यांनी गटात केला. सुरुवातीला 'परिसर' हा शब्द फळ्यावर लिहिला व त्या शब्दाच्या शेवटचे अक्षर र यापासून विद्यार्थ्यांना एक शब्द लिहायला सांगितला. त्यानंतर आणखी ४ शब्द विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीने निवडायला सांगितले व त्या ४ शब्दांपैकी, एक शब्द म्हणजे 'एखाद्या व्यक्तीचे नाव' असावे जे त्यांच्या कथेतील नायक/नायिका असेल हे सांगण्यात आले. त्यांचा शब्दांचा संच तयार झाल्यावर विद्यार्थ्यांना हे शब्द कथेत विणायला सांगितले. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कथेत त्यांचे वैयक्तिक अनुभव दिसून आले. भाषिक चुका सुद्धा विद्यार्थ्यांनी केलेल्या आहेत. एका गटाने लिहिलेल्या कथेचे उदाहरण खाली दिले आहे.

कथेचे नाव: नरेंद्रची आई

पहिला शब्द: रवी

विद्यार्थ्यांना सुचलेले इतर शब्द: थवा,नथ, यज्ञ, नरेंद्र

एक कडलास नावाचे गाव होते.

सूर्य उगवला होता पक्षांचा थवा आकाशात फिरत होता.

नरेंद्रची आई सकाळी देवळात गेली होती.

तिथे तिची नथ यज्ञात पडली पण तिथे तिला काही जाणवले नाही.

ती घरी आल्यावर नथ काढण्यासाठी नाकाला हात लावला तेव्हा–

तिला कळाले की, आपली नथ पडली आहे.

कथालेखन या उपक्रमात विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना व्यक्त करण्याची संधी मिळते. त्यात ते आपल्या विचारांशी सुसंगत चित्र तयार करू शकतात आणि तर्कसंगत प्रवाह आणून कथा निर्माण करू शकतात. कथालेखन उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शब्दांशी खेळण्याची मनोरंजक संधी मिळते. त्यायोगे भाषेच्या विकासास प्रोत्साहन होते आणि भावनांना शब्दांत व्यक्त करण्यास शिकायला मिळते.

काव्यरचना आणि कथालेखन अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रहात वाढ होते सुधारणा होते, अभिव्यक्तीस चालना, कल्पनाशक्तीचा विकास आणि प्रसंगांना क्रमाने लावून शब्दांनी जोडण्यास हे उपक्रम फायदेशीर

ठरू शकतात. यासारखे भाषेचे सोपे उपक्रम विद्यार्थ्यांना व्याकरण, शब्दसंग्रह, उच्चारण आणि शब्दलेखनांशी परिचित होण्यास मदत करतात. संशोधनाने असे ही कळते की, जेव्हा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा, विकास होतो तेव्हा त्यांच्या कार्यक्षमतेचा विकास होतो. मात्र विद्यार्थ्यांच्या सर्जनात्मक कार्याचा अधिक प्रभावीपणे मूल्यांकन कसे करता येईल याचा विचार होणे गरजेचे आहे. हे उपक्रम अधिक परिणामकारक करायचे असतील तर अशा भाषिक उपक्रमांसाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आभार:

डॉ.कल्पना खराडे आणि श्री.प्रकाश नवाळे यांच्या अभिप्रायाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. उन्हाळी शिबिरात सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष आभार व केंद्रातील इतर सदस्यांचे आभार!

संदर्भ:

१) बोडेन, एम. ए. (२००१) सृजनशीलता आणि ज्ञान. क्राफ्ट, ए., जेफ्री, बी., आणि लेबलिंग, एम. (एड्स), शिक्षणातील सर्जनशीलता (पान क्र. ९५-१०२). लंडन.